**ठळक बातम्या**

- राज्याची अर्थव्यवस्था २०३२ पर्यंत १ ट्रिलियन डॉलरची होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्याकडून व्यक्त

- २०२६ हे वर्ष भरती वर्ष म्हणून राबवलं जाणार असल्याची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा

- अजित पवार यांच्या विमान अपघाताशी संबंधित तथ्यं सभागृहासमोर मांडण्याचे विधान परिषद सभापतींचे आदेश

- सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी **आणि**
- टी-ट्वेंटी विश्वचषक स्पर्धक भारताविरुद्धच्या सामन्यात नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा झिम्बॉब्वेचा निर्णय

**<><><><><>**

महाराष्ट्र ही देशातली सर्वात मोठी अर्थव्यवस्था असून २०३२ मध्ये राज्य एक ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी व्यक्त केला. विधानसभेत राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावावरच्या चर्चेला ते आज उत्तर देत होते. राज्याची अर्थव्यवस्था गेल्या अकरा वर्षांत १३ लाख कोटींवरून वाढून ५१ लाख कोटींवर गेली आहे. तसंच महाराष्ट्र तीस लाख कोटींचं जीएसटी संकलन करतो, असं मुख्यमंत्री म्हणाले.

दावोस मध्ये झालेल्या करारांपैकी ७५ टक्के करारांची अंमलबजावणी होते. २०२५ मध्ये झालेल्या करारांपैकी ८२ टक्के करारांची अंमलबजावणी होत आहे, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. देशातील एकूण परकीय गुंतवणुकीच्या ३९ टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात होते असं त्यांनी नमूद केलं.

**होल्ड बाईट मुख्यमंत्री *(२६ सेकंद)***

**<><><><><>**

राज्यातल्या तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी २०२६ हे वर्ष भरती वर्ष म्हणून राबवलं जाणार आहे, अशी घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणावरच्या चर्चेला ते विधानपरिषदेत उत्तर देत होते. राज्यात नवी औद्योगिक क्रांती होत असून राज्याच्या विकासाची गती आता कुणीही थांबवू शकत नाही, असं ते म्हणाले.

***होल्ड... बाईट- एकनाथ शिंदे (२१ सेकंद)***

विकास हा फक्त मुंबई-पुण्यापर्यंत मर्यादित न ठेवता औद्योगिक विकासाचं विकेंद्रीकरण करण्यात आलं आहे, असं त्यांनी सांगितलं. विरोधकांनी जनतेचे प्रश्न मांडावेत, जनतेला न्याय द्यावा, पण ते केवळ विरोधाला विरोध करत आहेत, अशी टीका त्यांनी केली.

**<><><><><>**

राज्य विधानसभेत आज पुरवणी मागण्यांवरच्या चर्चेला सुरुवात झाली. श्रावण बाळ योजना, संजय गांधी निराधार योजना, शिवभोजन योजना अशा योजनांसाठी निधी मिळत नाही. जिल्हा परिषद शाळा बंद पडत आहेत, अनेक शाळांत शिक्षक नाहीत, स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी ट्रेनिंग सेंटर नाही अशा तक्रारींचा पाढा काँग्रेस नेते नितीन राऊत यांनी वाचला. रोजगार हमी योजनेकडे सरकारचं दुर्लक्ष झाल्याचं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील म्हणाले.

**<><><><><>**

महारेरा अंतर्गत थकित रकमेच्या वसुलीचे प्रमाण ३४ टक्के आहे. ते वाढवण्याचं आश्वासन मंत्री शंभुराज देसाई यांनी आज विधानसभेत दिलं. राज्य शासनाने वसुली प्रक्रिया अधिक प्रभावी करण्यासाठी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना विशेष निर्देश दिले आहेत. विकासकांच्या मालमत्तेचा शोध घेण्यासाठी भूमी अभिलेख, मुद्रांक विभाग, मालमत्ता कर विभाग, कंपनी नोंदणी विभाग, आरटीओ तसेच

आवश्यकतेनुसार आयकर विभागाकडून अतिरिक्त माहिती घेण्याचे निर्देश दिले आहेत. संबंधित विकासकांची इतर जिल्ह्यांतील मालमत्ता शोधून ‘आरआरसी’ प्रक्रियेद्वारे वसुली केली जाणार असल्याचंही देसाई यांनी सांगितल.

**<><><><>**

अजित पवार यांच्या विमान अपघाताशी संबंधित तथ्यं सरकारनं सभागृहासमोर मांडावीत, असे निर्देश विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी आज दिले. या प्रकरणी २८ तारखेला चर्चा करावी, या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार शशिकांत शिंदे यांनी स्थगन प्रस्ताव मांडला होता.

**<><><><>**

अजित पवार यांच्या अपघात प्रकरणी बारामती पोलीस ठाण्यात एफआयआर नोंदवून घेतला नाही, असं आमदार रोहित पवार यांनी सांगितलं. ते वार्ताहरांशी बोलत होते. या प्रकरणाचा तपास सीआयडी करत असल्याने एफआयआर नोंदवला जाऊ शकत नाही, असं आपल्याला पोलिसांनी सांगितल्याचं पवार म्हणाले. त्यामुळे आपण सीआयडी अधिकाऱ्यांची भेट घेतल्याचं त्यांनी सांगितलं. त्यांना डीजीसीएच्या अहवालाबद्दल विचारलं असता त्याबद्दल माहिती नसल्याचं अधिकाऱ्यांनी सांगितल्याचं पवार यांनी बातमीदारांना सांगितलं.

**<><><><>**

अजित पवार यांच्या मृत्यूला कारणीभूत ठरलेल्या विमान अपघात हा अपघातच होता की घातपात होता, यावर सीआयडी, अर्थात गुन्हे अन्वेषण विभागाच्या तपासाचा भर असल्याचं अतिरिक्त पोलिस महासंचालक सुनील रामानंद यांनी आज पुण्यात वार्ताहर परिषदेत सांगितलं. AAIB, म्हणजेच विमान अपघात अन्वेषण विभागाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यातले निष्कर्ष सीआयडीच्या तपासात समाविष्ट केले जातील, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी सुनेत्रा पवार यांची निवड झाली आहे. पक्षाचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी आज मुंबईत झालेल्या पक्षाच्या राष्ट्रीय अधिवेशनात ही घोषणा केली. प्रफुल्ल पटेल यांनी सुनेत्रा पवार यांच्या नावाचा प्रस्ताव ठेवला, याला सुनील तटकरे यांनी अनुमोदन दिलं आणि एकमताने त्यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाली. आगामी राज्यसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून पार्थ पवार यांच्या उमेदवारीची घोषणा प्रफुल्ल पटेल यांनी केली.

**<><><><>**

भारत आणि इस्रायल यांच्यात आज विविध क्षेत्रांमधले सामंजस्य करार झाले. सांस्कृतिक देवाण-घेवाण, भू-भौतिक अन्वेषण, मत्स्योद्योग आणि जलशेती, युपीआय आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करुन शिक्षण सुधारणा इत्यांदी क्षेत्रांचा यात समावेश आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आमि इस्रायलचे प्रधानमंत्री बिन्यामिन नेत्यान्यू यांच्यात झालेल्या शिष्टमंडळस्तरीय चर्चेनंतर हे सामंजस्य करार करण्यात आले. काळाच्या कसोटीवर सिद्ध झालेली भारत-इस्रायल भागिदारी आता विशेष धोरणात्मक भागिदारीच्या दर्जाला नेण्याचा ऐतिहासिक निर्णय दोन्ही देशांनी घेतला आहे, आज महत्वाच्या उभरत्या तंत्रज्ञानासाठी भागिदारी करण्याचा निर्णय दोन्ही देशांनी घेतल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

राज्यात नोंदणी प्रक्रियेसाठी आता ई-बॉण्डची सुविधा उपलब्ध होणार आहे अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे. या सुविधेमुळे नागरिकांना घरबसल्या ई-बॉण्ड काढून मुद्रांक शुल्क ऑनलाइन भरता येईल.

**<><><><>**

विमान प्रवाशांना आता तिकीटं आरक्षित केल्यानंतर ४८ तासांच्या आत अतिरिक्त शुल्क न भरता ती रद्द करता किंवा बदलता येतील, असं डीजीसीएनं

म्हटलं आहे. यासाठी काही अटींची पूर्तता प्रवाशांना करावी लागेल. देशांतर्गत प्रवासाला ७ दिवस आणि आंतरराष्ट्रीय प्रवासाला १५ दिवसांपेक्षा कमी कालावधी शिल्लक असेल तर हे नियम लागू होणार नाहीत.

विमान कंपनीच्या संकेतस्थळावरून तिकीट आरक्षित केल्यानंतर २४ तासांच्या आत प्रवाशाने त्रुटी निदर्शनाला आणून दिल्या तर विमान कंपन्यांनी कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारता येणार नाही. मात्र, एजंट किंवा पोर्टलच्या माध्यमातून तिकीट आरक्षित केलं तर पुढच्या १४ कार्यालयीन दिवसांच्या आत परतफेडीची जबाबदारी विमान कंपन्यांवर असेल, असं विभागाने स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

टी-ट्वेन्टी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या सुपर एट चा पहिल्या गटाच्या सामन्यांमध्ये आज भारत आणि झिम्बाब्वे यांच्यादरम्यान सामना सुरू आहे. चेन्नईत सुरू असलेल्या या सामन्यात नाणेफेक जिंकून झिम्बाब्वेने प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या एका षटकांत बिन बाद १३ धावा झाल्या होत्या.

भारताला उपान्त्य फेरीत स्थान मिळवण्यासाठी आजचा सामना तसंच येत्या रविवारचा वेस्ट इंडिजबरोबरचा सामना या दोन्हीमध्येही विजय मिळवणं आवश्यक आहे.

**<><><><><>**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज देशभरातून त्यांना अभिवादन करण्यात आलं. त्यांना भारतरत्न देण्यात यावा अशी मागणी आमदार प्रसाद लाड यांनी आज विधानपरिषदेत केली.

**होल्ड - प्रसाद लाड**

**<><><><><>**

गेल्या २४ तासात मध्य महाराष्ट्रात किमान तापमानात लक्षणीय तर मराठवाडा आणि विदर्भात किंचित घट झाली.

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**